## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1980

## THE DISSOLUTION OF OSMANABAD AND PARBHANI ZILLA PARISHADS AND TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २५ डिसेंबर, १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोले,
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1980

## AN ACT TO PROVIDE FOR DISSOLUTION OF OSMANABAD AND PARBHANI ZILLA PARISHADS, TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS AND APPOINTMENT OF ADMINISTRATORS.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २६ डिसेंबर १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन् १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

**उस्मानाबाद आणि परभणी जिल्हा परिषदांचे विसर्जन करणे, निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे आणि प्रशासकांची नेमणूक करणे यांसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९६२ चा महा. ५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेल्या, उस्मानाबाद जिल्हा परिषद आणि परभणी जिल्हा परिषद यांच्या सभासदांचा सहा वर्षांचा पदावधी, दिनांक ३१ मार्च १९८० रोजी संपणार होता ;

**आणि ज्याअर्थी,** निवडणूक आयोगाकडून त्यावेळी सुधारण्यात येत असलेल्या, महाराष्ट्र विधानसभा मतदारयादीच्या आधारावर सार्वत्रिक निवडणुका घेण्याच्या प्रयोजनाकरिता, उक्त सभासदांचा पदावधी, उक्त अधिनियमाच्या कलम १०, पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये काढलेली शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्र. झेडपीइ. १०८० (सीआर-२५६)-सदतीस, दिनांक २४ मार्च १९८० याद्वारे, ३० जून १९८० हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत वाढवण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग आणि इतर संबंधित अधिकारी यांना महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासंबंधीची त्यांची कर्तव्ये पार पाडण्याकडे आपले प्रयत्न एकवटणे आवश्यक झाल्याने, उक्त सभासदांचा पदावधी, उक्त अधिनियमाच्या कलम १० पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्र. झेडपीइ. १०८० (सीआर-२५६)/सदतीस, दिनांक २८ मे १९८० याद्वारे, सहा महिन्यांपर्यंतच्या कमाल अनुज्ञेय मुदतीपर्यंत म्हणजेच ३० सप्टेंबर १९८० हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत आणखी वाढवण्यात आला होता.

**आणि ज्याअर्थी,** पावसाळ्यामुळे व इतर प्रशासकीय अडचणीमुळे, ३० सप्टेंबर १९८० पूर्वी सार्वत्रिक निवडणुका घेणे सोयीचे व व्यवहार्य नव्हते आणि पावसाळा संपल्यानंतर देखील, या दोन जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग आणि इतर संबंधित अधिकारी यांना आता, साधारणपणे मार्च १९८१ च्या मध्यापर्यंत, १९८१ च्या भारतीय जनगणना कार्याशी संबंधित असलेली त्यांची कर्तव्ये पार पाडण्याकडे आपले प्रयत्न एकवटणे आवश्यक झाले आहे, त्यामुळे ३० जून

१९८१ पूर्वी सार्वत्रिक निवडणुका घेणे व त्यांचे सर्व टप्पे पूर्ण करणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** वर नमूद केलेल्या कारणांमुळे या दोन जिल्हा परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका, ३० जून १९८१ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त दोन जिल्हा परिषदांचे सभासद आणि त्यांच्या पंचायत समित्यांचे व इतर संस्थांचे सदस्य यांनी, पूर्ण पदावधीचा लाभ यापूर्वीच घेतला असून त्यांना पदावर ठेवणे आवश्यक वाटत नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** औपचारिकपणे पूर्वोक्त दोन जिल्हा परिषदांचे विसर्जन करणे आणि परिणामी, नवीन जिल्हा परिषदांची रीतसर पुनर्रचना होईपर्यंतच्या मधल्या काळात, जिल्हा परिषदा व इतर संस्था यांच्या अधिकारांचा वापर करणे व त्यांची कर्तव्ये पार पाडणे यासाठी प्रशासक नेमण्याचा अधिकार घेणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त बाबी व त्यांच्याशी संबंधित बाबी यांसाठी तरतूद करणारा कायदा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल यांची खात्री झाली होती ; आणि म्हणून त्यांनी, उस्मानाबाद व परभणी जिल्हा परिषदांचे विसर्जन करणे आणि निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे अध्यादेश, १९८० हा, २५ सप्टेंबर १९८० रोजी प्रख्यापित केला होता ; १९८० चा महा. अध्यादेश ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, उस्मानाबाद व परभणी जिल्हा परिषदांचे विसर्जन करणे आणि निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे अधिनियम, १९८० असे म्हणता येईल.

(२) तो २५ सप्टेंबर १९८० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, राज्य शासनाने या अधिनियमान्वये उस्मानाबाद जिल्हा परिषद किंवा यथास्थिती, परभणी जिल्हा परिषद आणि तिच्या पंचायत समित्या, स्थायी समिती, विषय समित्या व इतर समित्या यांच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेली व्यक्ती ;

(ब) "नेमलेली तारीख" म्हणजे, २६ सप्टेंबर १९८० ;

(क) "पंचायत समितीची निवडणूक" म्हणजे पंचायत समितीच्या सदस्याची निवडणूक ;

(ड) "जिल्हा परिषदेची निवडणूक" म्हणजे जिल्हा परिषदेच्या सभासदाची निवडणूक ;

(ई) "मुख्य अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ; १९६१ चा महा. ५.

(फ) "जिल्हा परिषद" म्हणजे, उस्मानाबाद जिल्हा परिषद किंवा यथास्थिति परभणी जिल्हा परिषद;

(ग) या अधिनियमात वापरलेल्या परंतु यात व्याख्या न केलेल्या शब्दांचा व शब्द प्रयोगांचा अर्थ, मुख्य अधिनियमात त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच असेल.

उस्मानाबाद व परभणी जिल्हा परिषदांचे विसर्जन आणि प्रशासकांची नेमणूक. ३. (१) मुख्य अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा उप-विधी किंवा काढलेल्या अधिसूचना यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नेमलेल्या तारखेस, उस्मानाबाद जिल्हा परिषद आणि परभणी जिल्हा परिषद या विसर्जित होतील.

(२) अशा रीतीने जिल्हा परिषद विसर्जित झाल्यानंतर पुढील परिणाम होतील,—

(अ) सर्व सभासद आणि पंचायत समितीचे, स्थायी समितीचे, विषय समित्यांचे किंवा इतर समित्या असल्यास त्यांचे सदस्य, नेमलेल्या तारखेपासून, सभासद किंवा सदस्य म्हणून असलेली आपली पदे रिक्त करतील;

(ब) नेमलेल्या तारखेपासून ३० जून १९८१ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत, किंवा राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा त्या आधीच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा केलेला आहे) जिल्हा परिषद, पंचायत समित्या, स्थायी समिती किंवा विषय समित्या किंवा इतर समित्या यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये राज्य शासन वेळोवेळी त्याबाबतीत नेमील अशा व्यक्तीकडून वापरण्यात येतील व पार पाडण्यात येतील;

(क) खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेली व्यक्ती, पुनर्रचित जिल्हा परिषदेच्या गणपूर्ती झालेल्या पहिल्या बैठकीपर्यंत पद धारण करील ;

(ड) खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेल्या व्यक्तीला, तिचे कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये एखाद्या व्यक्तीकडे किंवा एखाद्या समितीकडे अथवा उप-समितीकडे सोपविता येतील.

निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे.

४. मुख्य अधिनियम किंवा तदन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम, विनियम किंवा उप-विधी किंवा काढण्यात आलेल्या अधिसूचना यात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त कालावधीत, जिल्हा परिषदेची किंवा कोणत्याही पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक घेण्यात येणार नाही.

समाप्त जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची पुनर्रचना करण्यासाठी करावयाची व्यवस्था.

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त मुदत समाप्त होण्यापूर्वी किंवा समाप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, मुख्य अधिनियमाच्या आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार, नवीन जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांची रचना करण्यासाठी, जिल्हाधिकारी आणि संबंधित इतर अधिकारी, राज्य शासन **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशा तारखेस (ही तारीख उक्त मुदत समाप्त होण्यापूर्वीची तारीख असेल) व्यवस्था करतील.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५ लागू असणे.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, मुख्य अधिनियमाचे उपबंध, संबंधित जिल्हा परिषदांना आणि पंचायत समित्यांना, योग्य त्या फेरफारांसह, इतर सर्व बाबतीत लागू असतील.

अडचणी दूर करणे.

७. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट, प्रसंगपरत्वे आदेशाद्वारे करता येईल.

सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

८. (१) उस्मानाबाद व परभणी जिल्हा परिषदांचे विसर्जन करणे आणि निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे अध्यादेश, १९८० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

१९८० चा महा. अध्यादेश ८.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश धरून) ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार करण्यात आल्याचे किंवा यथास्थिति, काढण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. श्री. कानिटकर,
भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उप-सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.